# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission


माहितीचा अधिकार

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०६/२०२०/३७१ दिनांक-०२.११.२०२०

| | |
|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | :२१.०८.२०२० |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | :१४.०९.२०२० |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | :०८.१०.२०२० |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | :०२.११.२०२० |

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकारी अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**अपील क्र. ०६/२०२०**

**अपीलकर्ता:** श्री. उज्वलराय मोरेश्वर जोशी

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपिलाचे तथ्य :-**

१) अपिलकर्ता यांनी दिनांक २१.०८.२०२० रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत अर्ज केला. त्यानुसार प्रतिवादी यांनी दिनांक १४.०९.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली. त्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी दिनांक ०८.१०.२०२० रोजी वरील अपिल दाखल केले आहे.

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक १९.१०.२०२० रोजी नोटिस पाठवून दिनांक २६.१०.२०२० रोजी आयोगाच्या कार्यालयात सुनावणी आयोजीत केली. सुनावणीच्या वेळेस माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांची प्रकृती ठिक नसल्याने त्यांनी अपिलार्थी यांना सोईचे व्हावे म्हणून अपिलार्थी यांची 'व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे' सुनावणी घेतली.




१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

अपिलार्थी यांनी त्यांची सुनावणी प्रत्यक्ष घेण्यात यावी अशी विनंती केली, करीता पून:श्च त्यांची सदर अपिलावर दि.२९.१०.२०२० रोजी सुनावणी घेण्यात आली. अपिलार्थी यांनी आपले लेखी व मौखिक निवेदन सादर केले. माहिती अधिकारी यांनी आपले मौखिक निवेदन सादर केले.

**३) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहेत -**

**मागितलेली माहिती:-**

अपिलार्थी यांनी दि. १०.०४.२०१९ रोजी सायंकाळी ६वाजून १६ मिनिटांनी आयोगास पाठविलेल्या ई-मेल वर करण्यात आलेल्या कार्यवाही बाबत घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत तसेच देण्यात आलेल्या आदेशाबाबत/निवाड्या बाबत माहिती देण्यात यावी.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-**

The information has been sought about action taken on the email sent after the case was reserved for Order cannot include within its fold answers to the question, which would be the same thing as asking reason for a justification for a particular thing. The PIO cannot expect to communicate the reason why a certain thing was done or not done in the sense of a justification are matters within the domain of adjudication authorities and cannot properly be classified as information under the RTI Act, 2005.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-**

देण्यात आलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने हे कलम १९(१) अन्वये हे अपिल.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-**

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अधिकाराच्या अर्जात मागीतलेली माहिती हि अपिलार्थी यांनी आयोगात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या विरोधात दाखल केलेल्या प्रकरण क्रमांक- ३२/२०१९ या संबंधाने आहे. आयोगाने दिनांक २३.०४.२०१९ रोजी वरिल प्रकरणात आदेश पारित केले आहे व ते आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अपिलार्थी यांनी दि.१०.०४.२०१९ रोजी पाठविलेला ई-मेल हा प्रकरण क्रमांक-३२/२०१९ शी संबंधित आहे व अपिलार्थी यांनी त्यांच्या वरील नमूद तारखेस पाठविलेल्या ई-मेल वर करण्यात आलेल्या कार्यवाही बाबत, घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत तसेच देण्यात आलेल्या आदेशाबाबत/निवाड्या बाबत माहिती देण्याची मागणी केली आहे. आयोगाने प्रकारण क्र.३२/२०१९ आदेश पारित करून योग्य न्यायनिवाडा दिलेला आहे व त्या आदेशाची प्रत अपिलार्थी यांना सुनावणी दरम्यान देण्याची अपिलीय अधिकारी यांनी तयारी दर्शविली, परंतू अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे तो आदेश उपलब्ध असल्याने त्यांना आदेशाची प्रत नको हवी असे सुनावणी दरम्यान सांगितले. आयोगाच्या आदेशात अपिलार्थी

यांनी मागीतलेल्या माहितीचा समावेश आहे. माहिती अधिकाराअंतर्गत अपिलार्थी यांच्या ई-मेल वर काय कार्यवाही झाली इत्यादी बाबींवर माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती पूरविलेली आहे. माहिती अधिकारा अंतर्गत कार्यवाही काय झालेली आहे यावर माहिती अधिकारी आयोगाच्या आदेशावर आपले मत देवू शकत नाही, कारण आयोगाने आदेश पारित केलेले आहे. अपिलार्थी यांना त्या प्रकरणातील उपलब्ध असलेले व मागणी केलेले संपूर्ण दस्तऐवज माहिती अधिकारा अंतर्गत देण्यात येईल. परंतू अपिलार्थी यांनी असे कुठलेही दस्तऐवज उपलब्ध करून द्यावे अशी माहिती मागीतलेली नाही.

करीता, माहिती अधिकारी यांनी पारित केलेले आदेश योग्य आहे व प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यात कुठलाही हस्तक्षेप करण्याची गरज वाटत नाही.

वरील माहितीअधिकाराच्या अनुषंगाने मा.केंद्रीय माहिती आयोग यांची निर्णयाचे काही संदर्भ या अपिलाच्या अनुषंगाने संदर्भासाठी देण्यात येत आहेत:

In the matter of Mrs. Bina Saha vs. CPIO, Securities and Exchange Board of India (Decision dated November 6, 2012), the Hon'ble CIC held that: *"It must be remembered that Section 2(f) of the RTI Act defines information as a material or virtual record. The citizen has every right to get copies of such records held by any public authority including the SEBI. However, in order to get the copies of such records, the information seeker has to specify the details of the records she wants. In fact, section 6(1) of the RTI Act very clearly states that the information seeker has to specify the particulars of the information sought by him or her".*

The Hon'ble CIC in the matter of *Shri.P.Shivkumarn and Shri.K.Vijayakumaran Vs. CPIO, Baharat Sanchar Nigam Ltd. (Decision dated 13.06.2007), held that: "information seeker should asked for information, which may be available 'in any material form' as per section (2) of the Act. A CPIO is not expected to formulate his response to various forms of queries and express his views on the issues raised by appellants. The information should be provided in the form in which it exists with the public authority."*

The Hon'ble CIC in the matter of *Shri Madan lal Aswal and Dal Chand Vs. CPIO Municipal Corporation Delhi (Decision dated 05.11.2008) held that "The respondent has replied to the query about the ownership of the land and the responsibility of maintenance …………… The appellant now wants to know why action of demolition has not been taken, before allotment which according to him was precondition. Though the respondents are well intentioned, reasons for actions or inaction of public authorities*

*cannot be obtained unless they have been recorded by the public authority. The PIO cannot be expected to provide reasons unless they are recorded."*

The Hon'ble CIC in the matter of *Sh. Triveni Prasad Bahuguna vs. LIC of India, Lucknow (Decision dated September 6, 2012), had held that: "The Appellant is informed that ... redressal of grievance does not fall within the ambit of the RTI Act ..." Further, in Mr. H. K. Bansal vs. CPIO & GM (OP), MTNL (Decision dated January 29, 2013), the Hon'ble CIC had held that: "The RTI Act is not the proper law for redressal of grievances/disputes ..."*

करीता सबब अपिल नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

<u>निर्णय</u>

अपिल नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.

(अनिलकुमार उके)
संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी

प्रति,
श्री. उज्वलराय मोरेश्वर जोशी,
४, देविका सोसायटी, रामभाऊ म्हाळगी मार्ग,
अष्टविनायक चौक, मीठ बंदर रोड,
ठाणे (पूर्व), पिन-४०० ६०३.
मो.नं.९८६९४६४०४३

(अनिलकुमार उके)
संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी